मुंबई विद्यापीठ : मराठी विभाग

एम. फिल. (मराठी)

शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये सुरू होणाऱ्या एम. फिल. (मराठी) प्रवेशासाठी ज्या विद्यार्थ्यांनी अर्ज सादर केले आहेत त्यांची लेखी परीक्षा दिनांक १४ नोव्हेंबर २०१७ रोजी सकाळी ११ ते १२ या वेळेत घेण्यात येईल. सदर परीक्षेस येताना पदव्युत्तर परीक्षेच्या गुणपत्रिकेची व पदवी प्रमाणपत्राची छायांकित प्रत जोडणे आवश्यक आहे. तसेच अनुसूचित जाती-जमाती व इतर मागासवर्गीय उमेदवारांनी जातीच्या दाखल्याची मूळ कागदपत्रे घेऊन येणे अनिवार्य आहे. लेखी परीक्षा झाल्यानंतर इच्छुक प्रवेशार्थींची मौखिक परीक्षा त्याच दिवशी घेण्यात येईल व त्यानंतर सदर विद्यार्थ्याचा प्रवेश निश्चित होईल.

प्रवेश परीक्षेसाठी पुढीलपैकी कोणत्याही एका विषयावर आयत्यावेळी निबंधलेखन. (गुण २०)
दिनांक : १४ नोव्हेंबर १७, वेळ : १ तास (सकाळी ११ ते १२)

१) साहित्यप्रकाराची संकल्पना स्पष्ट करून साहित्यप्रकाराच्या वर्गीकरणामागील तत्त्वे विशद करा.

२) अरुण साधू यांचे मराठी कादंबरी विश्वातील योगदान स्पष्ट करा.

## एम. फिल. (मराठी) – अभ्यासक्रमाविषयी

विद्यार्थ्यांच्या संशोधनप्रवृत्तीला महत्त्व व प्राधान्य देणारा एम. फिल. हा एम. ए. पदवीनंतरचा शंभर गुणांचा तीन अभ्यासपत्रिकांचा अभ्यासक्रम आहे. विद्यार्थ्याला पीएच. डी.च्या पातळीवरील प्रबंधलेखनासाठी (वा स्वतंत्र संशोधनासाठी) आवश्यक ते तात्त्विक स्वरूपाचे ज्ञान मिळावे आणि काही कौशल्ये आत्मसात व्हावीत, या हेतूने हा अभ्यासक्रम योजलेला आहे.

या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यास एम. ए. द्वितीय श्रेणीत (पन्नास टक्के) उत्तीर्ण झालेले असणे आवश्यक आहे. सदर अभ्यासक्रम तीन सत्रांमध्ये पूर्ण करावयाचा असतो. या अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यास मराठी विभागाची प्रवेशपरीक्षा द्यावी लागते. शिवाय विद्यार्थ्यांची मुलाखतही घेण्यात येते. या दोन्हींत उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांसच प्रवेश दिला जातो. या अभ्यासक्रमासाठी जागा मर्यादित असतात.

स्वरूप :

सदर अभ्यासक्रमात एकेका अभ्यासपत्रिकेची वार्षिक परीक्षा ऐंशी गुणांची असते. विद्यार्थ्याने वर्षभरात त्या त्या अभ्यासपत्रिकेच्या संदर्भात जे निबंधलेखन/कार्यलेखन केले असेल, त्यासाठी १०० गुणांतील २० गुण राखून ठेवले आहेत. (२४० + ६० = ३००). उत्तीर्ण होण्यासाठी विद्यार्थ्यास प्रत्येक प्रश्नपत्रिकेत ५० टक्के गुण मिळावे लागतात. निकाल जाहीर करताना वर्ग दिला जात नाही.

एम. फिल.च्या अभ्यासपत्रिकांची योजना पुढीलप्रमाणे आहे :

**अभ्यासपत्रिका क्रमांक १ : संशोधनशास्त्र आणि शोधनिबंध**

विद्यार्थ्यांमध्ये संशोधनाची जिज्ञासा आणि क्षमता निर्माण करणे आणि वाढविणे, संशोधनविषयक सर्व अंगांचे आकलन करून देऊन संशोधनप्रक्रियेत सहभागी होण्यासाठी विद्यार्थ्यांची सिद्धता करवून घेणे, विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष संशोधनाचा अनुभव घेता यावा यासाठी प्रबंधलेखनाचा शास्त्रीय पद्धतीने परिचय करून देणे व उपयोजन करून घेणे हा या अभ्यासपत्रिकेचा उद्देश आहे.

**अभ्यासपत्रिका क्रमांक २ : साहित्यप्रकारांचा तात्त्विक अभ्यास**

या अभ्यासपत्रिकेमध्ये काव्यात्म, कथनात्म व नाट्यात्म या तीन साहित्यकोटींचा सविस्तर अभ्यास अभिप्रेत आहे.

**अभ्यासपत्रिका क्रमांक ३ : लेखकाभ्यास – तात्त्विक व प्रत्यक्ष अभ्यास**

या अभ्यासपत्रिकेमध्ये लेखकाभ्यासाचे सैद्धान्तिक विवेचन व प्रत्यक्ष एका आधुनिक लेखकाचा अभ्यास अभिप्रेत आहे.